जा.क्र.ना.बँका/डी-४/एमआयएस/ना.पत/प./०२
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक १-१२-२००२

प्रति,
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था (सर्व)

**विषय : नागरी सहकारी पतसंस्था / पगारदार सहकारी पतसंस्थांची एम.आय.एस.ची माहिती.**

**संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक दि. २३-९-२००२, १९-१०-२००२**

उपरोक्त विषय व संदर्भाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२) नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार सहकारी पतसंस्थांच्या एम.आय.एस. विषयक माहिती सादर करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रकीय सूचना अलाहिंदा देण्यात आलेल्या आहेत तथापी अजूनही सदर. सूचनांनुसार माहिती वेळेवर उपलब्ध होत नाही. ही बाब या कार्यालयाच्या निदर्शनास आलेली आहे. सबब नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार सहकारी पतसंस्थांच्या एम.आय.एस. विषयक खालीलप्रमाणे कार्यपद्धती पुनश्च आपणास कळविण्यात येत आहे. यापुढे खालील विहित नमुन्यात माहिती दरमहा १० तारखेस या कार्यालयास सादर करण्यात यावी. त्याचप्रमाणे माहितीच्या अनुषंगाने खाली नमूद केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देखील या कार्यालयास सादर करावा.

**विहित नमुना क्र. १ :**

रु. १ कोटी ते रु. १० कोटी ठेवी असलेल्या नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार सहकारी पतसंस्थांची माहिती.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | सी. डी. रेशो | ओव्हर ड्यूज % गुण | नफा/ तोटा | सी. डी. रेशो गुण | ओव्हर ड्यूज % गुण | नफा/ तोटा | एकूण गुण | वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

$$\left\{ \frac{\text{कर्जवाटप}}{\text{ठेवी}} \times १०० = \text{सी. डी.रेशो} \right\}$$

विहित नमूना क्र. २ : रु. १० कोटी व त्यावरील ठेवी असलेल्या नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार सहकारी पतसंस्थांची माहिती.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | सी. डी. रेशो | ओव्हर ड्यूज % गुण | नफा/ तोटा | सी. डी. रेशो गुण | ओव्हर ड्यूज % गुण | नफा/ तोटा | एकूण गुण | वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

मापदंड / वर्गीकरण :

१) व्यवस्थापन माहिती प्रणालीनुसार सर्व पतसंस्थांचे खालील बाबींवर मापदंड ठरविण्यात आलेले आहेत.

१) सी. डी. रेशो    २) ओव्हरड्यूज    ३) नफा-तोटा

सदर बाबींना द्यावयाचे गुण खालीलप्रमाणे :

१) सी.डी. रेशो    ४० गुण    २) ओव्हरड्यूज    ३० गुण

३) नफा-तोटा    ३० गुण

वर्गीकरणासाठी खालीलप्रमाणे गुण देण्याबाबत कार्यपद्धती अवलंबिलेली आहे.

| अ. क्र. | तपशील | टक्केवारी | गुण |
|---|---|---|---|
| १) | सी. डी. रेशो | ६० ते ७०% | ४० |
| | | ५५ ते ६०% | १० |
| | | ५५ पेक्षा कमी | ० |
| | | ७० ते ८० | १० |
| | | ८० च्या वर | ० |
| २) | ओव्हर ड्यूज (%) | ५% पेक्षा कमी | ३० |
| | | ५ ते १०% | २० |
| | | १० ते १५% | १० |
| | | १५% पेक्षा जास्त | ० |
| ३) | नफा-तोटा | निव्वळ नफा | ३० |
| | | तोटा | ० |
| ४) | वर्गीकरण | ७५% पेक्षा जास्त गुण असलेल्या संस्था | अ वर्ग |
| | | ५० ते ७५% | ब वर्ग |
| | | २५ ते ५०% | क वर्ग |
| | | २५% पेक्षा कमी | ड वर्ग |

वरील मापदंडानुसार आपल्या विभागातील रु. १ कोटी ते रु. १० कोटी ठेवी असलेल्या आणि व १० कोटी व त्यावरील ठेवी असलेल्या पतसंस्थांची मासिक माहिती विहित नमुना क्र. १ व २ मध्ये दरमहा १० तारखेपर्यंत या कार्यालयास प्राप्त होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी. तसेच सन २००१-२००२ या आर्थिक वर्षाच्या संदर्भात दि. ३१-३-२००२ अखेरची वसूल भागभांडवल, ठेवी, राखीव निधी, स्वनिधी या मुद्यांच्या अनुषंगाने वर्षातून एकदा एप्रिलमध्ये माहिती सादर करण्यात यावी. मात्र या आर्थिक वर्षाची माहिती डिसेंबर २००२ च्या एम.आय.एस. सोबत सादर करण्यात यावी.

आपल्या विभागातील ज्या पतसंस्थांना ड गट वर्गवारी प्राप्त झालेली आहे. अशा संस्थांची संबंधीत जिल्हा फेडरेशनच्या मदतीने दरमहा बैठक घेऊन त्यांच्या कामकाजाचा आढावा घ्यावा. विशेषतः त्यांच्या कर्जधोरणावर व खर्चावर योग्य नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना हाती घ्याव्यात, तसेच ज्या पतसंस्थांना क वर्ग मिळाला आहे. त्यांची दर तीन महिन्याने बैठक घेऊन त्यांच्या कामकाजाचा आढावा घेणे व मार्गदर्शन करणे.

सदर आढाव्यामध्ये,

१) ज्या पतसंस्थांचा सी.डी. रेशो १०० च्या वर आहे अशा पतसंस्थांचा सी.डी.रेशो ३ महिन्यामध्ये ९० च्या आत आणणे.

२) ९० ते १०० सी.डी. रेशो असलेल्या पतसंस्थांचा सी.डी.रेशो ३ महिन्यांमध्ये ८० च्या आत आणणे.

३) ८० ते ९० सी.डी. रेशो असलेल्या पतसंस्थांचा सी. डी. रेशो ३ महिन्यांमध्ये ७० च्या आत आणणे.

तोट्यातील पतसंस्थांच्या थकीत कर्ज वसुलीसाठी कृती कार्यक्रम आयोजित करून त्यांच्या कर्जवसुलीसाठी विशेष प्रयत्न करणे.

सदरील आढाव्याचा अहवाल देखील दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत या कार्यालयास सादर केला जाईल असे पहावे.

सही/-
**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा.क्र.ना. बँका/डी-४/एमआयएस/माहिती/२००३
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक : २४-२-२००३

# परिपत्रक

## विषय : सहकारी बँकांचे एम.आय.एस. नुसार वर्गीकरण करणेबाबत..
## संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक समक्रमांक दि. १३-८-२००२

कृपया आपले लक्ष उपरोक्त विषयाकडे वेधण्यात येत आहे.

२) वरील संदर्भांकित परिपत्रकान्वये नागरी सहकारी बँकांचे एम.आय.एस. प्रणालीनुसार गुण देण्यासाठी मापदंड निश्चित करण्यात आले असून या परिपत्रकीय सूचनांमध्ये खालीलप्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहे.

१) सी.डी.रेशो मधील बदल (गुण देण्याची पद्धती)

| | | |
|---|---|---|
| १) | सी.डी.रेशो ५०% पेक्षा कमी असल्यास | ० गुण |
| २) | सी.डी.रेशो ५०% ते ६०% असल्यास | ३० गुण |
| ३) | सी.डी.रेशो ६०% ते ७०% असल्यास | ४० गुण |
| ४) | सी.डी.रेशो ७०% ते ८०% असल्यास | ३० गुण |
| ५) | सी.डी.रेशो ८०% च्या पुढे असल्यास | ० गुण |

२) एम.आय.एस. माहिती नुसार माहिती पाठविताना बँकांचा प्रत्येक महिन्याला निघणारा नफा यापुढे न काढता मागील वर्षाचा दिनांक ३१ मार्च अखेरचा नफा माहिती प्रणालीमध्ये दर्शविण्यात यावा.

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे